REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख १५ जून, १९३८ अंक २४

## साविञिकाकूंचा स्वभाव साफ बदलला !

पुराणकाळांत काय, ऐतिहासिक काळांत काय किंवा हल्लींच्या चालू जमान्यांत काय.........
सावत्र आयांचा सावत्र पुत्रांचा छळ करण्याचा क्रम अव्याहतपणें चालूं आहे !
पण 'प्रभा' पिक्चर्सनीं लहानाकरवीं थोरांच्या नेत्रांत चांगलें अंजन घातलें !
" सदू "ला सापत्नमाता–सावित्रीबाई–फार छळत असा बोभाटा होता. पण सखारामपंतांनीं त्यांना " ध्रुव " दाखवितांच चमत्कार असा कीं सावित्रीकाकू फार प्रेमळ असें सदूच सांगू लागला.

## ७ वा आठवडा

शुक्रवार पेठ, मार्केटजवळ, पुणें ) ग्लोब टॉकीज, पुणें ( टेलिफोन नं. ६९१

दररोज दोन खेळ—६॥ व १० वा. शनि. व रवि. जादा खेळ दुपारीं ३॥ वा.

प्रभा पिक्चर–मराठी बोलपट

★ ध्रुव ★

भूमिका—बालकराम

नेतृत्वः–राजा पंडित

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

## पूना गेस्ट हाऊस

टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड–गणपति चौक–पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

## पराडकर टेलर्स अॅकॅडिमी

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )
येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

## विविध माहिती

**टाटा आयर्न अँण्ड स्टील कंपनी, लि.**

वरील कंपनीस १९३७-३८ साल अखेर २ कोटि, ८३½ लक्ष रुपये निव्वळ नफा झाला. ८८ लक्ष रुपये झीजखातीं टाकण्यांत आले आणि ४० लक्ष रुपये इनकम व सुपरटॅक्स ह्यांसाठी राखून ठेवण्यांत आले, ते वेगळेच. कंपनीच्या कारखान्यांतील कामगारांच्या रोजच्या हजेरीची सरासरी १९,२४८ इतकी होती.

**क्लिअरिंग हौसमधील देवघेव**

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हौसमध्यें १० जून रोजीं संपलेल्या आठवड्यांत ११½ कोटि रुपये किंमतीच्या ९०,७३० चेक्सची देवघेव झाली.

**विशेषांकास पोस्टाचे दरांत सवलत**

वर्तमानपत्रें अगर मासिकें ह्यांचे विशेषांक प्रसिद्ध करण्यांत येतात, त्यांचे दोन प्रकार असूं शकतात. कांहीं विशेषांक नेहमीच्या अंकाचाच भाग म्हणून गणले जातात, तर कांहीं विशेषांक स्वतंत्रपणें आणि नेहमींपेक्षां वेगळ्या आकारांत प्रसिद्ध होतात व त्यांच्या प्रकाशनांत ३१ दिवसांपेक्षां ज्यास्त मोठा खंड पडतो. नोंदलेल्या वर्तमानपत्रांचा भाग असें ह्या दुसऱ्या वर्गांतील पत्रांस म्हणतां येत नाहीं व त्यांस पोस्टाच्या दरांत सवलत मिळत नाहीं असा खुलासा पोस्ट खात्यानें जाहीर केला आहे.

**दुष्काळनिवारणासाठी पाणीपुरवठा**

कर्नाटकांतील दुष्काळी जिल्ह्यांत कालव्याचें पाणी पुरविण्यासाठी एक योजना आखण्याकरितां मुंबई सरकार एक तज्ञांची कमिटी नेमणार आहे. विजापूर जिल्हा विशेष दुष्काळी असल्यानें त्या जिल्ह्याचा प्रश्न आधीं हातीं घेतला जाईल.

**विजेच्या शिंगांस बंदी**

मोटारींचीं विजेचीं शिंगें वाजविण्यास मुंबई शहरांत बंदी करण्यांत यावयाची आहे. ह्यासंबंधांत लोकांनीं तक्रारी अगर सूचना करण्यास दोन महिन्यांची मुदत पोलीस कमिशनरनीं ठेविली आहे.

**पावसाचा अंदाज**

हिंदुस्थानांत, चालू पावसाळ्यांत, जून ते सप्टेंबर अखेर नेहेमींच्या सरासरीच्या सुमारें ९५ टक्के पाऊस पडेल, असा हवापाणी खात्याचा अजमास आहे.

**प्रवासावर नियंत्रण**

ग्रेट ब्रिटनमध्यें उतरणाऱ्या जर्मनाजवळ ब्रिटिश सरकारचा त्याबाबतचा परवाना असणें नुकतेंच बंधनकारक करण्यांत आलें. जर्मनीनेंहि त्याच प्रकारचा नियम आतां अंमलांत आणला आहे. ग्रेटब्रिटनमधील जर्मन वकिलानें परवानगीपत्रक दिल्याविना त्या देशांत ब्रिटिश नागरिकांस जातां येणार नाहीं.

**ट्रेझरी बिलांवर १ रु. ६ आणे ० पै व्याज**

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रु. ६ आ. ० पै इतका पडला.

**तुर्कस्तानांत ऑस्ट्रियन ज्यू डॉक्टर**

ऑस्ट्रियांतील सुमारें २०० ज्यू डॉक्टरांना तुर्कस्तान सरकार नोकरीवर घेणार आहे. ऑस्ट्रियांत एकूण सुमारें १,५०० ज्यू डॉक्टर आहेत, त्यांस ख्रिस्ती रोग्यांस उपचार करण्याची मोकळीक नाहीं व त्यांस सरकारी अगर निमसरकारी नोकरीहि मिळत नाहीं. तुर्की सरकारचा, ज्यू डॉक्टर नेमण्याचा उपक्रम त्यांपैकीं कांहींची दुःस्थिति निवारण करील.

**कोलार येथील खाणींतून सोन्याचें उत्पादन**

कोलार येथील सोन्याच्या खाणींतून १९३७ सालीं ३,३०,६९० औंस सोनें निघालें.

**दगडी कोळशाचें उत्पादन वाढलें**

१९३७ सालीं, हिंदुस्थानांतील कोळशाच्या खाणींतून एकूण २ कोटि, २३ लक्ष टन दगडी कोळशाचें उत्पादन झालें. १९३६ सालीं २ कोटि, ६ लक्ष टन दगडी कोळसा निघाला होता.

**हिंदुस्थानांतील धरणीकंप**

१९३७ सालीं हिंदुस्थानांत धरणीकंपाचे एकूण ८२ धक्के नोंदले गेले, त्यांपैकी ५२ हिमालय पर्वताचे आसपास होते. ब्रह्मदेशामध्यें धरणीचा २८ वेळां कंप झाला.

**मुंबई पोर्ट ट्रस्टच्या हिशेबांत वाढावा**

मुंबई पोर्ट ट्रस्टला, ३१ मार्च, १९३८ अखेर संपलेल्या वर्षी २ कोटि, ५०½ लक्ष रुपये उत्पन्न होऊन २० लक्ष रुपये वाढावा उरेल, असें पोर्ट ट्रस्टच्या कच्च्या रिपोर्टावरून दिसून येतें.

**हिंदी कपाशींत सुधारणा**

"हिंदुस्थानामध्यें कालव्याचे पाण्याखालीं कपाशीची लागवड वाढत आहे, ही गोष्ट अमेरिकेंतील कपाशीच्या उत्पादकांचे दृष्टीनें अत्यंत चिंतनीय आहे. हिंदी उत्पादनांत वाढ होत आहे, त्याबरोबर त्या कपाशीचा दर्जाहि सुधारत आहे. सुधारलेल्या अमेरिकन जाती हिंदुस्थानांत लावण्यांत येत आहेत, त्यामुळें अमेरिकन कपाशीशीं हिंदी कपाशीची तीव्र स्पर्धा होण्याचा संभव आहे" असा अभिप्राय एका अमेरिकन कपास तज्ञानें व्यक्त केला आहे.

**बिहार प्रांतांतील खून व दरवडे**

१ जानेवारी ते ३१ मार्च, १९३८ ह्या तीन महिन्यांचे अवधींत बिहार प्रांतामध्यें एकूण ७१ खून उघडकीस आले आणि ११० दरवड्यांची नोंद झाली.

**हिंदी चहाची निर्गत**

चहाच्या निर्गतीबाबतच्या करारनाम्यानुसार, १९३८-३९ मध्यें हिंदुस्थानास ३५ कोटि, ४५ लक्ष पौंड चहा निर्गत करतां येईल.

**जपानमध्यें कपाशीची आयात वाढणार**

जपानमध्यें कपाशीचा तुटवडा पडूं लागला असल्याकारणानें, त्या देशांत आयात होणाऱ्या कपाशीवरील नियंत्रण १ जुलै, १९३८ पासून सैल करण्याचा जपानी सरकारचा विचार आहे.

**हिंदी नाविक दलांतील अधिकारी**

हिंदी नाविक दलांतील १२७ अधिकाऱ्यांपैकी १३ हिंदी आहेत. दरसाल ९ जागा भरल्या जातात, त्यांपैकी ३ हिंदी लोकांच्या वांट्यास येतात.

**मॅट्रिक परीक्षेचा निकाल**

मुंबई विश्वविद्यालयाच्या मॅट्रिकचे गेल्या परीक्षेस १६,५९६ उमेदवार बसले होते, त्यांपैकीं ८,८१९ म्हणजे शेकडा ५३·१ उमेदवार उत्तीर्ण झाले. गेलीं कांहीं वर्षें इतका समाधानकारक निकाल लागला नव्हता.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | किंमत रुपये |
|---|---|
| २९-५-३८ ते ४-६-३८ | २९,८८,४७० |
| ५-६-३८ ते ११-६-३८ | १३,५२,३७१ |
| २१-९-३१ ते ११-६-३८ | ३,१४,८६,३६,९२७ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २८४ |
| २ हुंडणावळीचा प्रश्न धटास लावणार ! ... ... | २८५ |
| ३ गोखले संशोधन मंदिरांतील समारंभ ... | २८६ |
| ४ स्फुट विचार ... ... उमेदवारांच्या धंदेशिक्षणाची व्यवस्था—शेतकऱ्यांच्या उन्नतीचा मार्ग—परदेशी मालकांचें सिनेमागृह—युरोपियन हितसंबंधांचें रक्षण. | २८७ |
| ५ स्टॉक एक्सचेंजच्या नियमांत दुरुस्ती ... ... | २८८ |
| ६ डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स ... ... | २८९ |
| ७ मालाच्या किंमतीचा इस्तेबंदीनें फेड ... ... | २८९ |
| ८ फलज्योतिषांचा वाढता धंदा ... ... ... | २८९ |
| ९ " राष्ट्रधर्म " सरस्वती मठ संस्था ... ... | २८९ |
| १० सहकारी चळवळ ... | २९० |
| ११ सहकारी विमा ... | २९१ |
| १२ विमाविषयक निवाडा | २९२ |
| १३ ब्रिटिश रेल्वेजचा संसार | २९२ |
| १४ निवडक बाजारभाव | २९२ |


# अर्थ

बुधवार, ता. १५ जून, १९३८

## हुंडणावळीचा प्रश्न धटास लावणार ?

हिंदी चलनाचा सोन्याशी असलेला संबंध तोडून टाकून तो सरकारनें सोन्यापासून फारकत झालेल्या ब्रिटिश पौंड-स्टर्लिंगशीं जोडला तेव्हां त्या धोरणाचा परिणाम हिंदी उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांच्यावर काय होईल ह्याचा विचार करण्याची काळजी घेतली गेली नाहीं. विशिष्ट वजनाच्या सोन्याशीं ज्याचा कायदेशीर हक्कानें विनिमय होत असे असा सप्टेंबर, १९३१ पूर्वीचा पौंड निराळा आणि अशा विनिमयाचा लोकांचा हक्क नाहींसा झाल्यानंतरचा सध्यांचा पौंड निराळा. १८ पेन्सांचा हिंदी हुंडणावळीचा पूर्वीचाच दर कायम राहिल्यानें रुपयाचें विनिमय सामर्थ्य अबाधित राहिलें असें वाटण्याचा संभव असल्यामुळें सात वर्षांमागचा व आजचा पौंड आणि त्यास जोडलेला रुपया किंमतींत स्थिर राहिलेला नाहीं. हें ध्यानांत येणें आवश्यक आहे. हुंडणावळीचा दर स्थिर असणें हेंच राष्ट्राच्या चलन पद्धतीच्या चांगलेपणाचें एकमेव गमक नव्हे. देशांतील बाजारभाव उद्योगधंद्यांच्या सुस्थितीस परिपोषक असे निश्चित होण्यास हुंडणावळीचें आणि चलनविषयक व्यवस्थेचें सहाय मिळालें पाहिजे. किंमतींत उतरलेल्या पौंडास डांबून टाकलेल्या रुपयाची स्थिति ह्या प्रकारानें सहायकारक आहे काय ? हा प्रश्न येथें महत्त्वाचा आहे. रुपयास पौंडाबरोबर कमी-ज्यास्त किंमत कां यावी ? पौंडानें मापलेला १८ पेन्सांचा रुपयाचा दर हिंदी परिस्थिति व गरजा ह्यांस अनुसरून कां बदलला जाऊं नये ? हुंडणावळीच्या स्थिरतेचें स्तोम माजवून तिच्या दराचा विचार करण्याचें सरकार नाकारीत आहे आणि रिझर्व्ह बँकेच्या कायद्याचा बाऊ करून त्या संस्थेच्या अधिकारक्षेत्राकडे बोट दाखवीत आहे. सबब सात प्रांतांतल्या कॉंग्रेस मुख्य प्रधानांच्या मुंबईस भरलेल्या सभेंत हा प्रश्न धटाला लावावा असें ठरलें आहे. त्याप्रमाणें मुंबईच्या अर्थसचीवांनीं ह्या बाबतींत पहिलें पाऊल टाकलें असून इतर प्रांतांतल्या प्रधानांचें सहाय मागितलें आहे.

### कॉंग्रेसचा उपक्रम

कॉंग्रेसच्या सात प्रधान मंडळांनीं आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम हातीं घेतला आहे. शेतकरीवर्गाची दुःस्थिति दूर करण्यासाठीं त्यांनीं योजना आखल्या आहेत. परंतु बाजारभाव पडल्यामुळें शेतकरीवर्गाची व सामान्यतः सर्व लोकांची मिळकत अतिशय घटली आहे. जनतेपाशीं त्राण उरलेलें नाहीं, अशा स्थितींत तिच्या सुधारणेच्या सर्व योजना लुल्या पडतात. शेतींच्या मालास अधिक किंमत येण्यावर राष्ट्राची प्रगति अवलंबून असल्यानें त्या प्रश्नाकडे प्रांतिक सरकारांचें लक्ष वेधलें जावें हें स्वाभाविक आहे. हुंडणावळीच्या दराचा ह्या किंमतींशीं संबंध आहे ह्यांत संशय नाहीं. पण हुंडणावळ व चलन ह्यांच्या विषयींचे प्रश्न मध्यवर्ती सरकारच्या क्षेत्रांतले आहेत आणि तें सरकार तर त्या प्रश्नांस हात लावण्यास तयार नाहीं. रिझर्व्ह बँकेच्या सूचनेवांचून आपणांस ह्या प्रकरणांत कांहींच करतां येत नाहीं हा त्या सरकारचा युक्तिवाद फोल आहे हें आम्हीं "अर्थीं"त मागेंच दाखवलें आहे. राष्ट्राच्या हितासाठीं हुंडणावळीचा दर बदलणें आवश्यक आहे असें दिसून आल्यास त्या सरकारास रिझर्व्ह बँकेच्या सहकारानें वाटेल तें धोरण अंगिकारण्यास कांहींच अडचण नाहीं. कॉंग्रेस प्रधान मंडळें हिंदुस्थान सरकारावर एकजुटीनें वजन पाडून हुंडणावळीच्या दराचा प्रश्न हातीं घेण्यास त्यास लावणार आहेत आणि त्या विषयींचा उपक्रम मुंबईनें केला असल्याचें वर सांगितलेंच आहे. सामान्य जनतेच्या हितानहिताचा प्रत्यक्ष संबंध प्रांतांच्या राज्यकारभारांत विशेष येतो. मध्यवर्ती सरकारनें त्यांच्या अडचणी व गरजा समजून घेऊन त्यांच्याशीं सहकार्य करणें आवश्यक आहे. मध्यवर्ती कायदेमंडळास त्या सरकारवर जें वजन पाडतां येत नाहीं, तें प्रांतिक प्रधान मंडळें पाडण्यास उद्युक्त झालीं आहेत. त्यांच्या हालचाली काय होतात तें पहावें !

### हिंदुस्थान सरकारचा अपेक्षित नकार

हुंडणावळीच्या दरांत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न कॉंग्रेस प्रधान मंडळें करणार आहेत, ही बातमी प्रसिद्ध होतांच त्याबाबतचें हिंदुस्थान सरकारचें म्हणणें तात्काळ प्रसिद्ध होणें अपेक्षितच होतें. हुंडणावळीचा दर कमी-ज्यास्त होण्याचा संभव आहे अशी कल्पना लोकांत पसरली असतां आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या व्यवहारांत चलबिचल होण्यास वेळ लागत नाहीं. हा दर उतरवण्याची खटपट होऊन ती यशस्वी झाल्यास परदेशांत आज आपले पैसे साठवून ठेवणाऱ्यांचा फायदा आहे. येथें एक रुपया देऊन परदेशांत अठरा पेन्स स्टर्लिंग आज घ्यावयाचे आणि पुढें हुंडणावळीचा दर सोळा पेन्स झाल्यास त्या भावानें रकम परत आणून साडेबारा टक्के नफा मिळवावयाचा ह्या प्रकारचा हा व्यवहार आहे. म्हणजे, हुंड्यांची देवघेव व व्यापार ह्यांत आजच चलबिचल झाल्यावांचून रहावयाची नाहीं. ही आपत्ति लक्षांत घेऊनच हिंदुस्थान सरकारनें आजचा १८ पेन्सांचा हुंडणावळीचा दर आपल्या मतानें ह्या देशाच्या हिताचा आहे आणि तो स्थिर राखण्यास लागणारें सामर्थ्यहि आपणांत आहे, असें तातडीनें जाहीर केलें आहे. असें करतांना त्यांनीं दोन गोष्टी स्पष्टपणानें पुढें मांडल्या आहेतः—(१) १८ पेन्सांची हुंडणावळ हिंदुस्थानास हानिकारक आहे हा अभिप्राय सरकारच्या मतानें चुकीचा आहे. चालू दरच कायम रहाणें ह्या देशाच्या हितांचें आहे, असें त्यांनीं ठासून सांगितलें आहे. (२) पर-

राष्ट्रीय व्यापाराचा ओघ लक्षांत घेतां हा दर टिकविणें कठीण जाईल असें कोणी म्हणेल. सोन्याची व मालाची निर्गत कमी झाल्याकारणानें १८ पेन्सांचा दर सरकार कसा उचलून धरणार ह्या विषयीं कोणास शंका असल्यास त्या बाबतींत लोकांनीं निर्धास्त असावें असें त्यांचें म्हणणें आहे. परदेशांत पैसे पाठवण्यासाठी लागणाऱ्या हुंड्यांची टंचाई होऊन १८ पेन्सांचा दर घसरूं लागल्यास त्यास टेकू देण्याचें सामर्थ्य, हिंदुस्थान सरकार आणि रिझर्व्ह बँक ह्यांच्याजवळ सोनें व स्टर्लिंग ह्यांचा एकूण १६० कोटि रुपये किंमतीचा संचय आहे, त्यांत आहे, असें आश्वासन सरकार देत आहे. लोकांनीं गडबडून जाऊन हुंडणावळ उतरणार असा गैरसमज करून घेऊं नये ह्या उद्देशानें हिंदुस्थान सरकारनें जाहीर पत्रक काढलें आहे आणि त्यांत काँग्रेस प्रधान मंडळाच्या मागणीस स्पष्ट नकार दिला आहे.

### श्री. सुभाषचंद्र बोस यांचें उत्तर

हिंदुस्थान सरकारनें हुंडणावळीच्या दरांत बदल न करण्याचें आपलें निश्चित धोरण जितक्या स्पष्टपणें जाहीर केलें तितक्याच ठामपणानें राष्ट्रसभापति, श्री. सुभाषचंद्र बोस, ह्यांनीं "हुंडणावळीचा दर बदलणें सरकारास भाग पडेल" असा आपला विश्वास प्रकट केला आहे. हिंदुस्थानच्या हिताचे दृष्टीनें कोणता दर निश्चित करावा, हें विदेशी तज्ज्ञांपेक्षा आपल्या लोकनियुक्त प्रांतिक प्रधान मंडळांस चांगल्या तऱ्हेनें समजतें, असें त्यांनीं सांगितलें. हिंदी राष्ट्राचा फायदा कशांत आहे, हें ओळखण्याचा मक्ता विदेशी तज्ज्ञांस दिलेला नाहीं. विदेशी सभासदांचा भरणा असलेल्या कमिशन-कमिट्यांच्या सूचनांस हिंदी लोकमतानें आजवर कधीं विरोध केला नव्हता, असें नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या धोरणाविरुद्धहि अनेक वेळां संघटितपणें लोकमत व्यक्त करण्यांत आलें होतें. तथापि बेजबाबदार मध्यवर्ती सरकारास ह्या विरोधाची तीव्रता पटूनहि त्याबाबतचें आपलें धोरण बदलण्याची आवश्यकता वाटली नाहीं. सध्यां परिस्थिति पालटली असून प्रांतिक सरकारांचीं सूत्रें खऱ्याखुऱ्या लोकप्रतिनिधींच्या हातीं आलीं आहेत. हुंडणावळीच्या दरांत फरक घडवून आणण्याचें सामर्थ्य हिंदी लोकांत आलें आहे, असें श्री. सुभाषचंद्र ह्यांनीं सांगितलें आणि व्यापारी संस्थांनीं त्याबाबतच्या चळवळीस नेटानें हातभार लावावा, अशी विनंति केली. प्रांतिक प्रधान मंडळें, व्यापारी मंडळें आणि सामान्य जनता ह्यांनीं संघटितपणें यत्न केल्यास चळवळीस यश आलेंच पाहिजे असा त्यांस विश्वास आहे. आर्थिक प्रश्नाविषयींच्या सरकारविरोधी चळवळीस देशांतील प्रमुख राजकीय पक्षाचें व प्रांतिक सरकारांचें संघटित पाठबळ मिळण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे, ह्या दृष्टीनें त्याचें महत्त्व विशेष आहे. राष्ट्रीय चळवळींत आर्थिक बाबींस योग्य तें स्थान मिळूं लागलें आहे, हें प्रगतीचें चिन्ह आहे. जिव्हाळ्याच्या आर्थिक प्रश्नास मिळत असलेलें हें स्थान हिंदी राष्ट्राच्या जागरूक लोकमताचें निदर्शक असून, हिंदुस्थान सरकारावर त्याचा प्रभावी परिणाम झाल्यावांचून रहाणार नाहीं.

---

## गोखले राजकारण–अर्थशास्त्र संशोधन मंदिरांतील समारंभ

रविवार, ता. १२ जून रोजीं पुणें येथील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँन्ड इकनॉमिक्स ह्या संशोधन संस्थेतर्फे सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे जागेंत मुंबई प्रांताचे मुख्य प्रधान ह्यांचे हस्तें कै. ना. गोखले ह्यांचा पुतळा आणि कै. रा. ब. काळे ह्यांचें तैलचित्र ह्यांचें अनावरण करण्यांत आलें. सोसायटीचे अध्यक्ष, पंडित हृदयनाथ कुंझरु, ह्यांनीं प्रास्तविक भाषण केल्यानंतर इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर, प्रि. धनंजयराव गाडगीळ, ह्यांनीं इन्स्टिट्यूटच्या स्थापनेचा व प्रगतीचा अहवाल वाचून दाखविला. त्याचा गोषवारा खालीं दिला आहे:—

"गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँन्ड इकॉनॉमिक्स ह्या संस्थेची ता. १२ जून, १९३० रोजीं स्थापना झाली. राजकीय शिक्षण आणि प्रचार यासंबंधीं संघटित प्रयत्न करण्याविषयीं कै. गोखले ह्यांचा विशेष कटाक्ष होता आणि त्यासाठी अभ्यासू वृत्तीचें संवर्धन व्हावें, अशी त्यांची खटपट होती. संशोधकांची नेमणूक करून हें कार्य पार पाडणें सोसायटीस सुकर व्हावें, ह्या हेतूनें रा. ब. काळे ह्यांनीं सोसायटीस एक लाखावर रुपयांची देणगी देऊन तिच्या व्याजांतून कार्य चालावें, अशी योजना केली. श्री. धनंजयराव गाडगीळ हे इन्स्टिटयूटचे डायरेक्टर म्हणून नेमण्यांत आले. ह्या इन्स्टिटयूटमध्यें प्रत्यक्ष शिक्षणाचें व संशोधक तयार करण्याचें काम चालू आहे, त्याबरोबरच पुण्याच्या आसपासच्या प्रदेशांतील आर्थिक परिस्थितीची पाहणी व चालू महत्त्वाच्या प्रश्नांचा सूक्ष्म अभ्यास हेंहि कार्य चालू आहे. १९३१ सालापासून आतांपर्यंत इन्स्टिटयूटनें पांच पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. पुणें शहराच्या आर्थिक पहाणीचें काम संपत आलें असून एका वर्षाचे अवधींत त्याचा अहवाल प्रसिद्ध होईल. सोलापूर शहराच्या पहाणीचें कामहि त्यानंतर हातीं घेतलें जाईल. इन्स्टिटयूट मधील संशोधन शास्त्रशुद्ध पद्धतीनें केलें जातें. संस्थेला आपलें कार्यक्षेत्र वाढविण्यास मुबलक जागा आहे. सहाजीकच, ही गोष्ट साध्य होणें पुरेशा पैशाचे साधनावर अवलंबून आहे."

कै. ना. गोखले ह्यांचा पुतळा व कै. रा. ब. काळे ह्यांचें तैलचित्र ह्यांचें अनावरण करून नंतर मुख्य प्रधान नामदार श्री. खेर, ह्यांनीं आपल्या भाषणांत, लहानपणीं शाळेंत शिकणारा एक विद्यार्थी ह्या नात्यानें नामदार गोखले ह्यांच्या घरीं आपण कसे राहिलों ह्याचें रसभरित वर्णन केलें आणि स्वदेशप्रीति, दीर्घोद्योग आणि स्वार्थत्याग इत्यादि त्यांच्या गुणांचें श्रोत्यांस स्मरण करून दिलें. भारतसेवक समाजाच्या कार्याची महती काय आहे हें सांगून गोखले स्कूल ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्स ह्या संस्थेनें चालवलेल्या शास्त्रीय संशोधनाचा समाजास आणि सरकारास फार मोठा उपयोग आहे असा आपला अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला. महात्मा गांधी नामदार गोखले ह्यांस आपले गुरू समजतात आणि त्यांच्या परंपरेंत कार्य करणाऱ्या मंडळीस नामदारांची सत्यनिष्ठा व स्वार्थत्याग ह्यांचें कौतुक वाटणें स्वाभाविकच आहे. वस्तुस्थितीचें यथातथ्य ज्ञान हा प्रगतीचा पाया आहे आणि बहुसंख्य हिंदी शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यास अशा प्रकारची माहिती अत्यंत उपयुक्त आहे. रा. ब. काळे ह्यांच्या औदार्याचें औचित्य फार मोठें आहे. ह्या आशयाचे गौरवपूर्ण उद्गार नामदार खेर ह्यांनीं काढले. राइट ऑनरेबल श्री. शास्त्री ह्यांनीं आभार मानल्यानंतर समारंभ आटोपला.

# स्फुट विचार

## उमेदवारांच्या धंदेशिक्षणाची व्यवस्था

कारखान्यांत हातांनीं काम करण्याची आणि प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधि शिकाऊ हिंदी तरुणांस मिळण्यास अडचण पडते. विलायतेंतल्या धंद्यांचे बाबतींत त्या प्रकाराची गैरसोय अनेक वर्षें भासत असल्यामुळें हिंदी सरकारास हरतऱ्हेचा माल पुरवणारांनीं हिंदी उमेदवारांस शिकण्याच्या सवलती दिल्या पाहिजेत अशी अट घालण्यांत यावी म्हणून सारखे प्रयत्न चालले आहेत. हिंदुस्थानांतलें मोठें गिऱ्हाइक हातांतून जाऊं नये ह्यासाठी विलायती कारखानदारांस ही अट मान्य करणें प्राप्त होतें. शिकाऊ तरुणांस उमेदवार म्हणून आपल्या कारखान्यांत काम करूं देण्यास त्यांचे मालक स्वाभाविकपणानें नाखुष असतात. तथापि, हा व्यावहारिक कराराचा प्रश्न असल्यानें सरकारी खातीं आणि निमसरकारी संस्था ह्यांस तरुणांच्या धंदेवाइक अनुभवासंबंधानें अटी घालतां येणें शक्य होतें. ज्या हिंदी धंद्यांस जकातीचें संरक्षण दिलें जातें त्यांचेकडूनहि होतकरू तरुणांच्या व्यावहारिक शिक्षणाची सोय करण्यांत येत आहे. मुंबई सरकारचीं खातीं आणि निमसरकारी संस्था ह्यांचे बाबतहि अशीच व्यवस्था केली जावी या आशयाचा एक ठराव प्रांतिक विधिमंडळांत गेल्या जानेवारी महिन्यांत मान्य झाला. त्याची अंमलबजावणी करण्याचें सरकारनें ठरवलें असून त्याप्रमाणें हुकूम काढले आहेत. म्युनिसिपालिट्या व इतर स्थानिक संस्था ह्यांनींहि आपणांस माल पुरवणाऱ्या धंदेवाल्यांवर उमेदवारांच्या व्यावहारिक शिक्षणाबाबत अटी घालाव्या असें सरकारनें त्यांस कळविलें आहे. प्रस्तुत प्रकरणीं निश्चित योजना आखाव्या लागतील आणि त्यांस अनुसरून उमेदवारांच्या धंदेशिक्षणाची तजवीज करावी लागेल. विधिमंडळानें व्यक्त केलेला आणि सरकारनें मान्य केलेला अभिप्राय व्यापक स्वरूपाचा आहे. त्याचा उद्देश स्पष्ट आहे, पण त्यास निरनिराळ्या ठिकाणीं आणि भिन्नभिन्न उद्योगांत प्रत्यक्ष कृतीचें स्वरूप कसें द्यावयाचें ह्या विषयीं निश्चित योजना झाली पाहिजे. नाहींतर करार केवळ कागदावर रहातील आणि त्यांचा अपेक्षित फायदा कोणासच विशेष रीतीनें होणार नाहीं.

---

## शेतकऱ्यांच्या उन्नतीचा मार्ग

यवतमाळ सेंट्रल बँकेचा रौप्य महोत्सव ता. ५ जून रोजीं साजरा झाला त्याप्रसंगीं अध्यक्ष, श्री. वैकुंठराय मेहता, ह्यांनीं आपल्या भाषणांत शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीस सहकारी चळवळ कशी हातभार लावूं शकेल, ह्याचें अत्यंत मार्मिक विवेचन केलें. वऱ्हाड प्रांतांतील सुपीक जमिनी व त्यांतील भारी किंमतीचीं व्यापारी पिकें ह्यांच्या आधारावर तेथील सहकारी चळवळ उत्तम रीतीनें यशस्वी होईल, असा विश्वास वाटत होता तो गेल्या दहा वर्षांतील प्रतिकूल अनुभवानें पार नाहींसा झाला असल्याचें त्यांनीं प्रथमच सांगून टाकलें. शेतकऱ्यांच्या जमिनीस खरेदीदार मिळत नाहींत व सोसायट्यांस स्वतः त्या विकत घ्याव्या लागतात आणि प्रसंगविशेषीं मध्यवर्ती बँकांसहि त्या आपल्या ताब्यांत घेणें भाग पडतें. जमिनींच्या तारणावरच शेतकी पतपेढ्यांचे व्यवहार चालणें अपरिहार्य आहे, तथापि कर्जदारांची कर्जाची फेड करण्याची व्यक्तिशः पात्रता व त्यांची विश्वासार्हता, ह्यांचें मूलग्राही महत्त्व विसरून चालणार नाहीं, असें ते म्हणाले. चांगल्यां, मध्यम व कनिष्ठ अशा मोसमांतील उत्पादन व बाजारभाव ह्यांच्या सरासरीच्या हिशेबावरूनच कर्जफेडीची पात्रता ठरविणें आवश्यक असतें; परंतु ह्या गोष्टीचा पुरा विचार आजवर न झाल्यानें धनको व ऋणको हे दोघेहि आज अडचणींत सांपडले आहेत. श्री मेहता ह्यांनीं ब्रह्मदेशांतील सहकारी चळवळीच्या पुनर्घटनेबाबतची रिझर्व्ह बँकेची पहाणी ह्या संबंधांत कशी मार्गदर्शक होईल, हें दाखवून दिलें. प्रत्येक खेड्यांत बँकेची स्थापना होणें तूर्त अशक्य असलें, तरी शहरांतील बँकांस तालुक्याचे शहरीं शाखा काढून आणि इतर मार्गांनीं शेतकऱ्यांस सहायकारी होऊन त्यांच्या उन्नतीस हातभार लावणें शक्य आहे, असें त्यांनीं सांगितलें. शेतकऱ्यास दिलेल्या कर्जाची फेड, त्याचे मालाच्या विक्रींतून करून घेण्याची योजना सर्वत्र अंमलांत येणें आवश्यक आहे व त्यासाठीं शेतकी पतपेढ्या, जमीन गहाणाच्या बँका व सेल सोसायट्या ह्यांनीं एकमेकांशीं सहकार्य केलें पाहिजे, असें श्री. मेहता ह्यांनीं सुचविलें. ज्या देशांत शेतकरी किरकोळ दरानें विकत घेतो व घाऊक दरानें विकतो, तेथें शेती निकृष्टावस्थेस जाणें अपरिहार्य आहे; तेव्हां शेतकऱ्यांच्या सर्वांगीण उन्नतीचा एकसमयावच्छेदेंकरून विचार करून उपाययोजना आखली पाहिजे ह्या त्यांच्या विधानाची सत्यता सर्वांस पटूं लागली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. लहान केंद्रांतील स्थानिक व्यापार व उद्योगधंदे ह्यांस भांडवल पुरवून आणि मालाच्या तारणावर कर्ज देऊन त्याच्या उठावास सहाय करून छोटेखानी बँकांस अत्यंत उपयुक्त कार्य करण्यास मोठें क्षेत्र रिकामें आहे. सहकारी चळवळ यशस्वी होणें त्यांतील कार्यकर्त्यांवर सर्वांशीं अवलंबून आहे, केवळ चांगल्या योजना आखण्यावर नाहीं, हें श्री. मेहता यांनीं स्पष्ट केलें. श्री. मेहता ह्यांची शेतकऱ्यांच्या उन्नतीबाबतची कळकळ व त्यांची सहकारावरील श्रद्धा ह्यांचें प्रतिबिंब त्यांचे भाषणांत आढळतें. त्यांच्या विचारप्रवर्तक भाषणाचा सहकारी कार्यकर्त्यांनीं काळजीपूर्वक अभ्यास करावा, असें आम्ही सुचवितों.

---

## परदेशी मालकीच्या सिनेमागृहाची मुंबई शहरांत स्थापना

मेट्रो थिएटर्स लि. ह्या परदेशी कंपनीच्या मालकीचें मुंबई येथील मेट्रो थिएटर नुकतेंच पुरें झालें असून त्याचें उद्घाटन गेल्या बुधवारीं झालें. ह्या सिनेमा गृहांत १,५०० लोकांची बसण्याची सोय आहे. "मेट्रो गोल्डविन मेयर" ह्या अमेरिकन कंपनीचे सर्व चित्रपट ह्या थिएटरांतच प्रथम लागतील हें उघड आहे. चित्रपट दाखविण्याच्या धंद्यांतील परकीयांचा हा प्रवेश हिंदी सिनेमा गृहांच्या धंद्यास हानिकारक होण्याचा संभव आहे. ह्या आक्रमणास लवकर आळा घालावा, अशा हेतूनें मोशन पिक्चर सोसायटीच्या चालकांनीं मुंबई सरकारचे गृहमंत्रि, श्री. मुनशी, ह्यांची भेट घेतली. हा प्रश्न हिंदी धंद्याचे दृष्टीनें जिव्हाळ्याचा आहे, तथापि तो हिंदुस्थान सरकारचे अधिकारांतील असून सध्याच्या घटना कायद्याखालीं मुंबई सरकार त्याबाबत कांहीं करूं शकेल, असें वाटत नाहीं, असें गृहमंत्र्यांनीं सांगितलें. तथापि, शक्य तो उपाय योजण्याचा मी यत्न करीन, असें त्यांनीं आश्वासन दिलें. मेट्रो चित्रपटगृहावर बहिष्कार घालण्याचा यत्न चालू आहे, त्यास विशेष यश मिळण्याचा संभव नाहीं. ग्रेटब्रिटनमध्यें, तेथील सिनेमागृहांतून विशिष्ट प्रमाणांत ब्रिटिश चित्रपट दाखविण्यांत आलेच पाहिजेत अशी सक्ती आहे. इतरहि

अनेक मार्गांनीं ब्रिटिश सिनेमाधंद्यास मदत दिली जाते. हिंदुस्थानांत मात्र हिंदी सिनेमाधंद्याच्या संरक्षणास कोणीच धांवत नाहीं. हिंदी नट-नटींचे सहायानें चित्रपट तयार करण्याच्या कंपन्या काढून देशी कंपन्यांशीं अनिष्ट स्पर्धा करण्याच्या प्रयत्नांतहि कांहीं विदेशी भांडवलवाले असण्याचा संभव आहे. प्रांतिक स्वायत्तता त्यास प्रतिबंध करूं शकेल किंवा कसें, तें लवकरच समजून येईल.

## युरोपियन हितसंबंधांचें रक्षण

हिंदुस्थानांतील आपल्या हितसंबंधांचें रक्षण करण्याकरितां युरोपियन लोक कसे नेटानें व संघटित यत्न करीत आहेत, ह्याचें ताजें उदाहरण म्हणजे बंगाल प्रांतिक कायदेमंडळ आणि मध्यवर्ती असेंब्ली ह्यांतील युरोपियन सभासदांस आवश्यक ती माहिती पुरविण्यासाठी स्थापण्यांत यावयाच्या खासगी खात्याचें होय. ह्या सभासदांस जरूर ती माहिती पुरविण्यासाठी खासगी देणगींतून हे स्वतंत्र खातें स्थापन करण्यांत यावयाचें आहे आणि त्यावर सेक्रेटरीची नेमणूक व्हावयाची आहे. हिंदी राजकीय क्षेत्रांत प्रभावी महत्त्व मिळविण्याचा युरोपियन अल्पसंख्यांकांचा हा यत्न आहे. इतर कोणत्याहि गटापेक्षां युरोपियन गट सुसंघटित आहे. त्याची कार्यक्षमता वरील योजनेनें वाढेल, हें उघड आहे. ज्यांचें जीवन हिंदुस्थानांतील ब्रिटिश व युरोपियन हितसंबंध सुरक्षित रहाण्यावर अवलंबून आहे, अशा लोकांकडून वरील कार्यासाठी फंड जमविण्यांत येईल, असें समजतें. चालू राजकीय व आर्थिक प्रश्नांचा सूक्ष्म व खोल अभ्यास करण्यास प्रत्येक सभासदास वेळ नसतो.हें कार्य पगारी सेक्रेटरीकडून करून घेऊन सभासदास आपलें कार्य सुकर करतां येण्यासारखें असतें. विधिमंडळांतील युरोपियन सभासदांप्रमाणें हिंदी लोकनियुक्त सभासदांसहि ह्या प्रकारचें सहाय उपलब्ध होणें आवश्यक आहे; कारण प्रतिपक्षावर करावयाची टीका जितकी पायाशुद्ध आणि माहितीपूर्ण असेल तितकी ती ज्यास्त परिणामकारक होते, असा अनुभव आहे.

## पुणें जिल्ह्यांतील अर्बन सहकारी संस्थांची परिषद

ही परिषद् गेल्या सोमवारीं प्रि. धनंजयराव गाडगीळ ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. तिचें उद्घाटन श्री. बापूसाहेब गुप्ते ह्यांनीं केलें आणि श्री. यशवंतराव दाते ह्यांनीं परिषदेस उपस्थित असलेल्या मंडळींचें स्वागत केलें. काँग्रेस प्रधानमंडळाचें धोरण सहकारी चळवळीच्या लोकशाही घटनेस प्रतिकूल नाहीं आणि अर्बन संस्थांनीं आपला कारभार काळजीनें आणि उत्साहानें चालवावा असा सल्ला श्री. बापूसाहेब यांनीं दिला. श्री. दाते यांनीं चळवळीच्या मार्गांतील अडचणींचा उल्लेख करून त्या दूर होण्याविषयींच्या उपायांची चर्चा परिषदेनें करावी असें सुचविलें. प्रि. गाडगीळ ह्यांनीं पुणें जिल्ह्यांतील अर्बन संस्थांमध्यें विविधता कां उत्पन्न होत नाहीं आणि त्यांची प्रगति कशा रीतीनें होणें शक्य व इष्ट आहे ह्याचें मार्मिक व मुद्देसूद विवेचन केलें. इन्स्टिट्यूटच्या कार्यक्षेत्राचा कोंडमारा होण्यासारखी त्याची पुनर्घटना सरकारमार्फत चालू आहे ती अनावश्यक आणि अनिष्ट असल्याचें त्यांनीं सांगितलें. शास्त्रीय पद्धतीनें तयार केलेल्या प्रगतीच्या योजनांची आवश्यकता प्रतिपादून त्या अमलांत आणण्यास जरूर असलेलीं उत्साही, तज्ज्ञ आणि जबाबदार माणसें कोठें आहेत हा प्रश्न अध्यक्षांनीं पुढें मांडला.

## स्टॉक एक्सचेंजच्या नियमांत दुरुस्ती

### २८ जून रोजीं अंमलबजावणीस प्रारंभ

मुंबई येथील रोखे बाजाराचें नियंत्रण करणाऱ्या "नेटिव्ह शेअर अँन्ड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशन"च्या संस्थेच्या नियमांत मुंबई प्रांतिक सरकारनें कांहीं दुरुस्त्या मंजूर केल्या आहेत. महत्त्वाच्या बहुतेक सर्व प्रश्नांवर सरकार आणि असोसिएशन ह्यांत मतभेद नाहीं, ह्या कारणानें कार्य सुकर झालें आहे. असोसिएशनच्या नांवांतील 'नेटिव्ह' हा शब्द हीनतानिदर्शक असल्यानें नवीन योग्य नांव सुचविण्याविषयीं सरकारनें असोसिएशनला कळविलें आहे. असोसिएशनच्या सभासदास इतर व्यवसाय करण्यास प्रतिबंध असावा ह्याविषयीं आतां विशेष मतभेद उरलेला नाहीं. स्टॉक एक्सचेंजमधील व्यवहारांतील देणीं उपस्थित होतां क्षणींच देऊन टाकावीं लागतात; तेव्हां तेथील सभासदास बाहेरील दुसऱ्या देण्याघेण्यांचा उपद्रव होऊं नये आणि प्रत्येक सभासदास दुसऱ्याच्या पतीचा अजमास करतां यावा, अशी तरतूद होणें आवश्यक असतें. ह्यासाठीं, रोखे बाजारांतील ब्रोकर्स निवळ ब्रोकर्सच रहावे, असा सरकारचा आग्रह आहे. असोसिएशनच्या नवीन सभासदांनीं दोन वर्षेपर्यंत ३० हजार रुपयांचे जामीन द्यावे अगर तेवढी रकम अनामत ठेवावी, हा नियम सरकारनें तूर्त मान्य केला आहे. तथापि, अनामत रकमेचा आकडा उतरवून त्याची मुदत मात्र सभासदत्वाच्या मुदतीइतकी करण्यांत यावी, असें सरकारचें मत आहे. असोसिएशनचा पांच वर्षें सभासद असल्याविना कोणासहि त्याच्या डायरेक्टरबोर्डाचे निवडणुकीस उभें रहातां येणार नाहीं, असा नियम सरकारनें मंजूर केला आहे; तथापि ही मुदत कमी करण्यासंबंधीं त्याचा असोसिएशनशीं पत्रव्यवहार चालू आहे. इतरहि अनेक बाबींचा कायम निकाल अद्याप लागावयाचा आहे. सरकारनें सुचविलेल्या दुरुस्त्या असोसिएशन विचारांत घेईल आणि त्या मंजूर करून सरकारास पुन्हां सादर करील. त्यानंतर सरकार त्या दुरुस्त्यांस मान्यता देईल. सरकार स्वतः होऊन दुरुस्त्या करूं शकत नाहीं. २८ जूनपासून दुरुस्त नियम अंमलांत येतील, असें समजतें.


# TEACHERS' TRAINING INSTITUTE

(RECOGNISED BY GOVERNMENT.)

**"A B. T. College in Miniature."**

**Course :** Secondary Teachers' Certificate (S. T. C.) given by the Government of Bombay.

**Eligibility :** Matriculation or any other higher qualification of a recognised University.

**Period :** One academic year's "FULL-TIME" Theoretical and Practical Training from June to March.

**Fees -** Rs. 100/- All inclusive: (Tuition, Social, Educational Trips, Material, Gymkhana, Library etc.)

**Last day of admission :** 30th June, 1938.

**Admission :** Restricted to 30 students only.

**Prospectus :** Sent free on request.

T. T. Institute,
N. M. V. High School,
Poona 2.

N. G. NARALKAR,
Superintendent.

## डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, पुणें.

व्यापारी शिक्षण देणारी ही महाराष्ट्रांतील सर्वांत जुनी संस्था आहे. संस्था १९१८ सालीं स्थापन झाली असून महाराष्ट्रांत व्यापारी शिक्षणाचा प्रसार मुख्यतः याच संस्थेनें केला आहे.

संस्थेंत सध्या इंडियन मर्चंट्स् चेंबर, मुंबई, तर्फे घेतल्या जाणाऱ्या डी. कॉम. डिप्लोमाचे तीन ग्रुप्स, ( Specialised Company Secretarial, Specialised Banking and Specialised Insurance ) शिकविण्याची व्यवस्था आहे. तसेंच, कॉर्पोरेशन ऑफ अकौंटंटस, ग्लासगो, या संस्थेच्या इंटरमीजीएट परीक्षेसाठी विद्यार्थी तयार केले जातात.

सध्या शिकविण्यांत येत असलेले कोर्सेस विद्यार्थ्यांना मार्गदर्शक व उपयोगी पडतात असें अनुभवानें ठरलें आहे.

यासेरीज शॉर्टहँड व टाईपरायटिंग शिकविण्याचीहि व्यवस्था आहे.

आतांपर्यंत शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांत मॅट्रिक, अंडरग्रॅज्युएट व ग्रॅज्युएट अशा तऱ्हेचे शिक्षण घेतलेले विद्यार्थी आहेत. या संस्थेंत शिक्षण घेऊन गेलेले विद्यार्थी निरनिराळ्या व्यापारी क्षेत्रांत नोकरी अगर धंदा या नात्यानें वावरत आहेत.

नवीन वर्ग २५ जूनला सुरू होत आहेत. तरी विद्यार्थ्यांनीं या संस्थेचा फायदा घ्यावा.

---

### मालाच्या किंमतीची हप्तेबंदीनें फेड

रेडिओ, मोटारी, घरघुती सामान, सायकली, इत्यादि मालाबद्दल पुरी किंमत दुकानदारास न देतां, प्रथम कांहीं रकम देऊन बाकी हप्तेबंदीनें फेडण्याची पद्धति आतां दृढमूल झाली आहे. हप्त्याहप्त्यानें मालाचे वापरासाठी भाडें देत असतांना विशिष्ट रकम भरून झाली, म्हणजे खरेदीदाराच्या संपूर्ण मालकीचा तो माल होतो; म्हणजेच खरेदीदार जिनसाची किंमत सवडीनें देत असतो. दुकानदारास मालाची पुरी किंमत मिळेपर्यंत मालकीहक्क त्याचेकडेच राहतो. त्याचा माल मात्र गिऱ्हाइकाच्या वापरांत असतो. ह्यांत दुहेरी सोय आहे खरी; पण सदरहु व्यवस्था ग्राहकांस सुखकर होण्याचे मार्गांत व्यापाऱ्यांच्या कांहीं कृत्यामुळें अडचणी येतात. हप्तेबंदीच्या व्यवहारांतील दुकानदारांच्या ह्या प्रकारच्या अनिष्ट कारवायांस आळा घालण्याचे उद्देशानें मिस् विल्किन्सन ह्यांनीं एक बिल ब्रिटिश कॉमन्स सभेंत आणलें होतें, तें बिनविरोध मंजूर झालें. मालाच्या किंमतीपैकीं एक तृतीयांश रकमेचे हप्ते भरून झाले असल्यास, पुढील हप्ता थकला म्हणून गिऱ्हाइकाकडील माल आपल्या ताब्यांत घेण्याचा अधिकार ह्यापुढें दुकानदारास उरणार नाहीं. दुकानदार आणि खरेदीदार ह्यांचेमध्यें सलोख्यानें तडजोड होऊं शकली नाहीं, तर कोर्टानें त्याबाबत योग्य तो निर्णय द्यावयाचा आहे. खरेदीदारानें जिनसाच्या किंमतीपैकीं एक द्वितीयांश रकमेचे हप्ते भरले असल्यास, खरेदीचा करार रद्द करण्याचा अधिकार वरील बिलानें त्यास दिला आहे. हिंदुस्थानांतहि हप्तेबंदीच्या विक्रीचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर होऊं लागले आहेत. मोटारींच्या धंद्यांत हप्तेबंदीमुळें अनेकांस नुकसान आलें आहे. नडलेल्या खरेदीदारास मालाची किंमत वेळींच देतां आली नाहीं, म्हणजे सहाजीकच विकेता घालील त्या अटी त्यास मान्य कराव्या लागतात. त्याच्या हिताचें संरक्षण व्हावें, ह्यासाठी मिस विल्किन्सन ह्यांनीं वरील बिल आणलें होतें. सावकार आणि कर्जदार ह्यांपैकीं कर्जदाराचें हित राखण्याकरितां कायद्याची योजना करण्यांत येते, तसाच हा प्रकार आहे.

---

### फलज्योतिष्यांचा वाढता धंदा

कुंडल्या, राशी आणि ग्रह ह्यांच्या स्थानांचीं वर्णनें, भविष्यकथन इत्यादींचा सुळसुळाट झाला असल्याची तक्रार महाराष्ट्रांत अलीकडे विशेष ऐकूं येते. परंतु असलाच प्रकार इंग्लंडमध्येंहि बोकाळला आहे असें दिसतें. संसार आणि उद्योगधंदा ह्यांच्या बाबतींत पुढें काय वाढून ठेवलें आहे हें जाणण्याची तेथील जनतेची इच्छा वाढल्या प्रमाणावर आहे आणि फलज्योतिष्यांचा धंदा तेथें चांगला फायदेशीर झाला आहे. कुंडल्या करून भविष्य सांगणारे हजारो लोक भोळ्या जनतेकडून पैसा उकळीत आहेत. ब्रिटिश फलज्योतिष्यांची एक परिषद् नुकतीच भरली होती, तीमध्यें अशा अलबत्या गलबत्या पोटभरूंच्या पैसे उकळण्याच्या हिकमतींचा निषेध करण्यांत आला. असल्या अपात्र धंदेवाल्यांच्या लीलांमुळें खऱ्याखुऱ्या फलज्योतिषाची हानि होते, अशी तेथें तक्रार करण्यांत आली. प्रतिष्ठित आणि विशुद्ध फलज्योतिषाचें संरक्षण करण्याचा विचारहि तेथें झाला. ह्या प्रकारच्या चळवळींचें महत्त्व महाराष्ट्रांतहि भासूं लागल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. पुणें येथें ता. ३० आणि ३१ मे रोजीं फलज्योतिष संमेलन भरलें होतें, त्यांत ज्योतिषांचा व ज्योतिषशास्त्राचा मराठी वाङ्मयांत विनोदनिर्मितीसाठीं उपहास केला जातो, त्याचा एका ठरावानें निषेध करण्यांत आला. येन केन प्रकारेण फलज्योतिषाचा उपयोग पोट भरण्याचा धंदा म्हणून केला जातो, त्याचाच वरील उपहास हा परिणाम आहे.

---

### "राष्ट्रधर्म" सरस्वती मठ संस्था

"राष्ट्रधर्म" सरस्वती मठ संस्था, मुंबई, या संस्थेच्या वर्गणीदारांची द्वैवार्षिक सर्वसाधारण सभा ता. ५-६-१९३८ रोजीं २६१।६३, हॉर्नबी रोड, फोर्ट, मुंबई येथें दुपारीं ५ वाजतां भरली होती. सभेंत १९३६-३७ सालचा अहवाल व हिशेब मंजूर झाल्यानंतर व पुणें आणि सोलापूर येथील शाखांनीं चालविलेल्या पोटसभांचें प्रतिवृत्त वाचून दाखविण्यांत आल्यानंतर संस्थेचे उपाध्यक्ष, रा. गोपुजकर, यांनीं १९३४-३५ साल अखेर प्रगतीशीं १९३६-३७ अखेरच्या प्रगतीची तुलना करून संस्थेची सर्व बाजूंनीं प्रगती झाली असली तरी संस्थेच्या हल्लीं १२ शाळा झाल्यामुळें कार्याचा व्याप किती वाढला आहे व तो व्यवस्थितपणें सांभाळण्यासाठीं एखाद्या आजीवसेवकाची जरूरी कशी आहे हें विशद करून सांगितलें. संस्थेच्या प्रचारकार्याच्या वाढीसंबंधीं कांहीं भाषणें होऊन सभा बरखास्त झाल्यावर अल्पोपहारानंतर गायनवादनचा व करमणुकीचा मनोरंजक कार्यक्रम झाला. सदर कार्यक्रमाचा सर्व खर्च त्याकरितां मिळालेल्या देणगींतून झाला.

---

### आशाजनक पर्जन्यवृष्टी

सर्व मुंबई प्रांतभर पर्जन्यवृष्टीस आतां प्रारंभ झाला आहे, असें प्रसिद्ध होणाऱ्या जिल्हानिहाय अहवालावरून दिसून येतें. मध्यप्रांत आणि वऱ्हाड इकडेहि पावसाळ्यास सुरवात झाली आहे. कांहीं ठिकाणीं पेरणी पुरी झाली असून इतर ठिकाणीं ती चालू आहे. दुष्काळी जिल्ह्यांतील पाण्याचें दुर्भिक्ष्य नाहींसें झालें आहे आणि दुःस्थितीची तीव्रता कमी होत आहे. चालू वर्षीं पावसाळ्याचा आरंभ आशाजनक आहे; मेघराजाची ही कृपा मोसमभर टिकावी, अशीच सर्वांची इच्छा असणें स्वाभाविक आहे. हिंदी शेतकऱ्यांचें जीवन पावसावर सर्वस्वी अवलंबून असल्यानें वक्तशीर पर्जन्याचें महत्त्व येथें विशेष आहे.

### को. सेक्रेटरीज ट्रेनिंग क्लास, सटाणा ( जि. नासिक )

सटाणा येथें शेतकी सोसायट्यांच्या सेक्रेटरींच्या शिक्षणाचा वर्ग नासिक जि. को. इन्स्टिट्यूटतर्फे ता. ६-६-३८ पासून चालू आहे. सदर क्लासचा उद्घाटन समारंभ सटाणा ता. सु. यूनियनचे चेअरमन श्री. धर्माजी तानाजी पाटील यांच्या हस्तें झाला. ते आपल्या भाषणांत म्हणाले:- "कोणतेंहि कार्य सुलभ रीतीनें करण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणजे सहकार्य होय. परंतु सहकार्याचा अर्थ, ज्या शेतकऱ्यांच्या हिताकरितां सहकारी चळवळ काढलेली आहे त्यांनाच मुळीं समजलेला नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे. या अवस्थेचें, शेतकऱ्यांमधील निरक्षरता हेंच मुख्य कारण होय. शेतकऱ्यांमधील कार्यकर्त्यांनीं या चळवळीचा पुरस्कार केलेला नाहीं म्हणूनच या चळवळीस यावें तसें यश आलें नाहीं. दिवसेंदिवस शेतकऱ्यांचीं मुलें अधिक प्रमाणांत व्ह. फा. परीक्षा पास होत आहेत. हींच मुलें पुढें सोसायटींचे मेंबर होणार व तेच सेक्रेटरी झालेले चांगले. या दृष्टीनें या क्लासाचें महत्त्व फार आहे. आपल्या सुदैवानें आपल्या इन्स्टिट्यूटचे प्रोपागँडा ऑफिसर श्री. एम. जी. शेटे फारच यथायोग्य मिळालेले आहेत. शिक्षण आस्थेनें घ्या व त्यांत प्रवीणता मिळाल्याबद्दल सर्टिफिकेट मिळवा. म्हणजे नोकरीच्या दृष्टीनें ती गोष्ट तुम्हांस हितावह होईल "

सदर प्रसंगीं सटाणा ता. को. सु. यूनियनचे सुपरवायझर श्री. दगा अजबा पाटील, फील्डमन श्री. तानाजी गोपाळ वाणी व प्रोपागँडा ऑफिसर श्री. शेटे यांचीं समयास अनुचित अशीं भाषणें झाल्यानंतर समारंभ खलास झाला.

### ठाणें जिल्हा पश्चिम भाग सहकारी परिषद

ठाणें जिल्हा कोऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटचे विद्यमानें वसई, पालघर, डहाणू, उंबरगांव वगैरे पश्चिम भागांतील सोसायट्यांची परिषद् शुक्रवार ता. २७ मे, १९३८ रोजीं दुपारीं मु. पालघर येथें श्री. दशरथसिंग हिरासिंग यांचे बंगल्यावर मुंबई प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँकेचे डायरेक्टर श्री. दत्तात्रय वामन राऊत, एम. एल. ए. यांचे अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आली होती. परिषदेस निरनिराळ्या सोसायट्यांचे प्रतिनिधी व इतर सद्गृहस्थ मिळून जवळ जवळ २००।२५० मंडळी हजर होती.

अध्यक्षांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत सहकारी चळवळीचीं मुख्य तत्वें व उद्देश यांचा ऊहापोह केला व जर शेतकऱ्यांना आपली आर्थिक परिस्थिति सुधारावयाची असेल तर त्यांनीं पांच प्रमुख तत्वांचा अवलंब केला पाहिजे असें सांगून चालू सालीं खात्यानें व्याजाच्या दिलेल्या सवलतीचा सर्व सोसायट्यांनीं अवश्य फायदा घ्यावा असें सांगितलें.

तद्नंतर श्री. सखाराम भिकाजी पाटील, नंदोरें, यांनीं आपल्या भाषणांत शेतकऱ्यांच्या सध्याच्या एकंदर आर्थिक हलाखीच्या परिस्थितीचें दिग्दर्शन करून सोसायट्यांचीं जीं कर्जे अगदींच बुडीत आहेत, व ४-५ वर्षांत ज्या कर्जावरील व्याजहि वसूल झालेलें नाहीं अशा कर्जावर बँकेनें व्याज आकारूं नये व सदर कर्जे हप्त्यांनीं वसूल करण्यांत यावीं असें सांगितलें.

परिषदेंत अनेक महत्वाचे ठराव मंजूर झाले.


## Sir Parashurambhau College, Poona 2.

The college opens on June 20, 1938. Students should secure their admission early by enrolling their names in the College Office. The College Prospectus giving all necessary information and containing the required application forms ( for the hostels-both for men and women ) will be sent gratis on request.

Sir Parashurambhau College, Poona 2.
Dated 31st May 1938.

R. D. KARMARKAR
Principal,

S. P. MANDALI'S

## SCHOOL OF COMMERCE.

( ESTD. 1933 )

**947, Sadashiv, Near Gokhale Hall, Poona 2.**

The Premier House of Business Education in the Presidency. The only Recognised Institution in Poona preparing students for Govt. Diploma in Commerce.

One year's Ideal Course in Accounting, Banking, Commerce, Finance, Correspondence, Type-writing etc. New Session from 20th June. Matriculation to be minimum qualification.

Admission upto 15th July.

Apply for prospectus.

SUPERINTENDENT.

## GOKHALE INSTITUTE of POLITICS AND ECONOMICS.

**Servants of India Society's Home, Poona 4.**

ADMISSIONS TO STUDENTS :—reading for the M. A. Examination by paper or by thesis in Economics. Two scholarships of Rs. 25 P. M. to be awarded to research students.

D. R. GADGIL,
Director.

## मराठी केन्द्र संस्था, पुणें

उन्हाळ्यानंतर १५ जून रोजीं सुरू होईल. यंदापासून मॅट्रिक नापास आणि नोकरी करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां बँकिंग आणि अकौंटन्सी या विषयांचे डिप्लोमा अभ्यासक्रम सुरू केले आहेत. शिक्षक वर्ग पदवीधर व अनुभवी असा असून परगांवचे विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुंदर सोय केली आहे. जास्त माहितीकरितां माहितीपत्रक मागवा.

आचार्य,
मराठी केन्द्र संस्था.
२९२ सदाशिव पेठ, पुणें.

## सहकारी विमा

लेः—श्री.डी. वाय. उपाचार्य,सुपरवायझर, नंदुरबार तालुका को. सुपरवायझिंग यूनियन लि०

भांडवलशाही विमा कंपनीचा उद्देश विम्याचा धंदा करणें व नफा मिळविणें हा असतो. सहकारी विम्याचा उद्देश, विमा ही सामाजिक गरज आहे ह्या दृष्टीनें विम्याचें तत्त्व लोकांस पटवून विम्याचे क्षेत्रांत सामिल होणें हा होय.

भांडवलशाही विमा कंपनींत भांडवलवाले भागीदार व विमेदार असे दोन वर्ग असतात. ह्या दोघांचे हितसंबंध एकमेकांचे विरुद्ध असतात. त्यामुळें भांडवलशाही विमा कंपनींत विमेदाराचें जेवढें हित व्हावयास पाहिजे तेवढें होत नाहीं. सहकारी विमा कंपनींत चालक व मालक हे एकच असल्यानें विमेदाराचें जास्तींत जास्त हितसंरक्षण होऊं शकतें.

कायद्याचे दृष्टीनें पाहिलें तर सहकारी सोसायट्यांना कांहीं सवलती देण्यांत आल्यामुळें कामाचा खर्च नेहमीं त्यांना कमी येतो. खर्च कमी करणें हा सहकारी सोसायट्यांचा महत्त्वाचा उद्देश असतो. जॉइंट स्टॉक कंपन्यांचा भरमसाठ खर्च करण्याकडे कल असण्याचा संभव असतो. दोघांमधील प्रत्यक्ष उदाहरण घेऊन फरक करावयाचा झाल्यास असें म्हणतां येईल कीं, भांडवलशाही विमा हा एखाद्या खानावळींत मिळणाऱ्या अन्नाप्रमाणें आहे आणि सहकारी विमा हा घरीं मिळणाऱ्या पोषक अन्नाप्रमाणें आहे. खाणावळींतील अन्न इतर पदार्थाप्रमाणें विकलें जातें. उलट पक्षीं आपलें घरचें अन्न हें आपले शरीरास पोषक या दृष्टीनें आपण उपयोगांत आणतो.

सहकारी पतपेढ्यामध्यें असलेल्या सभासदांची सर्वसाधारण प्रवृत्ति कर्ज घेण्याकडे असतें. कर्ज घेतलेला पैसा हा अर्थातच शिलक ठेवण्यासाठी घेतलेला नसतो. त्यामुळें तो खर्च होतो व तेवढी रकम कर्ज घेणारा कायमची गमवतो. खर्च केलेला पैसा हा परत केव्हांहि मिळत नाहीं. कर्ज घेण्यांचे प्रवृत्तीला आळा बसण्यासाठी सभासदांमध्यें काटकसर करण्याची प्रवृत्ती निर्माण झाली पाहिजे. ही प्रवृत्ति निर्माण करण्यास सहकारी विम्याचा चांगला उपयोग होतो. जसजशी ही प्रवृत्ति निर्माण होत जाईल, तसतशी कर्ज काढण्याची प्रवृत्ति कमी होत जाईल. शेतकऱ्यांमध्यें कर्जबाजारीपणा जास्त असल्यामुळें विम्याचा उपयोग त्यांना जास्त होईल व तसा ह्या विम्याचा फायदा ते घेत गेल्यास, तें परिणामीं त्यांस हितकारक होईल. ह्या सर्व गोष्टींचा विचार केल्यास, सरकारी विमाच ज्यास्त उपकारी आहे, हें पटेल.

---

### हिंदी कापडाची निर्गत असह्य होऊं लागली !

१९३७ सालीं हिंदुस्थानानें १९३६ च्या मानानें ११½ कोटि वार कापड ज्यास्त निर्गत केलें, तें बहुतेक सर्व ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांकडेच गेलें. ब्रिटिश कापडावर हिंदुस्थानांत २० आणि २५ टक्के जकात आहे आणि ओटावा कराराविषयीं हिंदी लोकमत ग्रेटब्रिटनचे हितास प्रतिकूल आहे. अशा परिस्थितींत, हिन्दी कापडाच्या निर्गतीवर बंधन घालणें श्रेयस्कर नाहीं काय ? असा प्रश्न ब्रिटिश कॉमन्स सभेंत विचारण्यांत आला. हिन्दी निर्गतीच्या वरील आकड्यांत एप्रिल, १९३७ नंतर ब्रह्मदेशाकडे पाठविलेल्या कापडाचाहि समावेश होतो, असें मि. ऑलिव्हर स्टॅन्ले ह्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानास ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांत मिळत असलेल्या सवलतींचा हिंद-ब्रिटन व्यापारी कराराचे वाटाघाटींत विचार करण्यांत येत आहे, असेंहि ते म्हणाले.


'यश आलेंच पाहिजे.
मग महाराष्ट्रीय कसले ?'

अशा स्वाभिमानी महाराष्ट्रीयांच्या आर्थिक साहाय्यानें सर्व मशिनरी आली, उभारणीला सुरुवात झाली, ५०० एकर उंसाची लागवड करतां आली.

तारीख १० जानेवारी १९३९च्या मकर-संक्रमणाला
बृहन्महाराष्ट्रीय साखर
व
१२५० एकर उंसाची नवी लागवड

यशाला मदत व दरसाल ५॥ टक्के व्याज व दोन वर्षांनीं रक्कम परत. डिपॉझिट रकमा घेण्यास बोर्डानें मंजूरी दिली आहे.

रा.ब.काकासाहेब सहस्रबुद्धे, डॉक्टर रा. ह. भडकमकर. M.A., M.D. रा. ब. बि. कृ. मुळ्ये इंदोर, रा. ब. रावजी जनार्दन भिडे यांच्या अभिप्रायांसह सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें.
२५७ बुधवार पेठ, पुणें २, बेलबागेसमोर.

स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेतेः—
धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डिपार्टमेंट नं. ६)
२५३/३ माधव विलास टिळकवाडी पुणें २.

### एक महत्त्वाचा विमाविषयक निवाडा

मेजर रॉलंडसनला सुमारें आठ लक्ष रुपयांचें कर्ज होतें. त्यानें रॉयल इन्शुअरन्स कंपनीकडील आपल्या ६½ लक्ष रुपये दर्शनी किंमतीच्या पांच पॉलिसींचे तारणावर सुमारें ९० हजार रुपये कर्ज काढलें होतें. ह्या ९० हजारांपेक्षा पॉलिसींची सोड किंमत ज्यास्त भरत नव्हती व रॉलंडसनजवळ हप्ते भरण्यास पैसेहि नव्हते. त्यानें हप्ता भरण्यास मागून घेतलेली मुदत ३ ऑगस्ट, १९३४ रोजीं दुपारीं ३ वाजतां भरत होती. आपलें कर्ज निवारण्यास रकम मिळावी, म्हणून रॉलंडसननें पॉलिसी लॅप्स होण्याचे अगोदर तीनच मिनिटें, म्हणजे ३ तारखेस दुपारीं २-५७ वाजतां स्वतःवर गोळी घालून आत्महत्या केली. पॉलिसींच्या रकमेची कंपनीकडे मागणी करण्यांत आल्यावर आत्महत्येचा विम्यावर काय परिणाम होतो ह्या विषयीं प्रश्न उपस्थित झाला. दोन वर्षेंपर्यंत त्याचा खल चालून अखेर लॉर्डांचे सभेनें त्यासंबंधीं निवाडा दिला. लॉर्ड एटकिन ह्यांच्या निकालाप्रमाणेंच इतर तीन लॉर्डांनीं मत व्यक्त केलें. लॉर्ड एटकिन म्हणाले:— " इंग्लिश कायद्याच्या तत्वाप्रमाणें, जाणूनबुजून आत्महत्या करून विम्याच्या रकमेचा क्लेम घडवून आणणाराच्या कृत्यानें विमा कंपनीवरील जोखीम नाहींशी होते. जोखमीस प्रारंभ झाल्यापासून एका वर्षानंतर विमेदार स्वतःचे मृत्यूस बुद्धिपुरःसर कारणीभूत झाला, तरी कंपनी क्लेमचे पैसे देण्यास बांधलेली आहे, असा विमाकराराचा अर्थ होतो. तथापि, ह्या कराराची कायद्यानें अंमलबजावणी करतां येते किंवा नाहीं, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. स्वतः गुन्हा करून, त्यापासून फायदा मिळविण्यासाठी न्यायमंदिराचा अवलंब करण्याचा कोणासहि अधिकार नाहीं, असें कायद्याचें तत्त्व आहे. बुद्धिपुरःसर केलेली आत्महत्त्या इंग्रजी कायद्याखाली गुन्ह्याचे सदरांत येते. अशा स्थितींत मयत विमेदाराच्या वारसांस विम्याचे पैसे मागण्याचा हक्क उरत नाहीं. कर्जास तारण म्हणून विमा पॉलिसींचा प्रत्यहीं उपयोग करण्यांत येतो, त्यांची ह्या विषयीची उपयुक्तता वरील तत्त्वानें बाधित होईल व धनकोस सुरक्षितपणा वाटणार नाहीं, हें खरें आहे. ह्या पुढें विमा कंपन्यांस आपल्या अटींच्या शब्दप्रयोगांत इष्ट तो बदल करावा लागेल, असें दिसतें. "

### ब्रिटिश रेलवेजचा संसार

ग्रेट ब्रिटनमध्यें रेल्वेजवरील उतारूंकरितां ६,६८३ व मालाचे वहातुकीसाठी ६, ९०९ स्टेशनें आहेत. ५¾ लक्ष लोकांस रेल्वेजवर काम आहे व त्यांच्या पगाराची रकम सालिना सुमारें १⅓ अब्ज रुपये भरते. दरवर्षी २५ कोटि रुपये आगगाडीचे रस्ते व इमारती सुस्थितींत राखण्यासाठी व त्यांची दुरुस्ती करण्यासाठी खर्च होतात. इंजनें, डबे, वाघिणी, इत्यादींवर ह्याहिपेक्षां ज्यास्त खर्च होतो. दरसाल १,४०० मैलांतील रूळ बदलण्यांत येतात, आणि त्यासाठी २ लक्ष, ८ हजार टन वजनाचे रूळ आणि ४० लक्ष स्लीपर्स लागतात. १९३७ सालीं ६ नवीन एक्सप्रेस गाड्या सुरू करण्यांत आल्या, ५०० नवीं इंजनें उपयोगांत आणलीं गेलीं व उतारूंचे २,००० नवे डबे वापरण्यास काढले गेले. दररोज सुमारें १०० आगगाड्या सुटल्यापासून अखेरपर्यंत न थांबतां १९ ते २९९ मैलांचें अंतर तोडतात आणि जलद चालणाऱ्या ६६१ मालगाड्या रोज ये-जा करतात, त्यांपैकीं कित्येक शंभर, शंभर मैल अखंड धावतात. गेल्या वर्षीं ब्रिटनमधील आगगाड्यांनीं एकूण ६० कोटि मैल प्रवास केला.

**Deccan Institute of Commerce Poona.**

Opens for the 1938–39 Session on Saturday the 25th June 1938. Students coached up for various Commercial Diploma and Certificate Examinations in Accountancy, Banking, Shorthand, Typewriting, etc. Courses suitable for Matriculates, Undergraduates and Graduates. Classes in the Morning and Evening. Prospectus free on application to:—

592/3 Budhwar Peth, Opp. New English School, Poona. } SECRETARY.

**The Willingdon College, Sangli.**

Reopens for the new academic year on the 20th of June. Registration of Names commence from the 6th June. The College provides for both Arts and Science courses in the first two years, for B.A. Degree Courses, pass and honours, and for Post-Graduate instruction. About a hundred seats are available in the College Hostels. Healthy surroundings, cheapness and efficiency are the special features of the College.

The tuition fees are Rs. 60 per term, and the room rent per term is Rs. 12 for a double and Rs. 15 for a single room. Boarding charges come to about Rs. 12 P. M.; Further information can be had on application.

Arrangements have been made to secure accommodation for lady students in a well-conducted hostel in Sangli, pending the construction, in the next few months, of a separate Women's Hostel on the College premises.

D. G. KARVE,
Principal.

**दि गुड-वुइल**
**इन्शुअरन्स कंपनी लि.**
पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल
विमेदारास
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

### इंडस्ट्रिअल ॲडव्हायसरी बोर्ड

मुंबई प्रांतिक सरकारास औद्योगिक प्रश्नांबाबत सल्ला देण्याचें काम "इंडस्ट्रिअल ॲडव्हायसरी बोर्डा"कडे सोपविण्यांत आलें असून ह्या बोर्डाची घटना आणि तिचें कार्यक्षेत्र ह्यासंबंधीं सरकारनें पत्रक काढलें आहे. बोर्डास उपसमित्या नेमण्याचा अधिकार आहे. बोर्डाचे रिपोर्ट डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिजचे मार्फत सरकारास सादर व्हावयाचे आहेत. सर चुनीलाल मेहता हे बोर्डाचे अध्यक्ष असून श्री. एस. पी. ओगले ( ओगले कांचकारखाना ), बी. ए. दाबके ( डायरेक्टर, मुगरजी गोकुळदास मिल ), एन. जी. पवार ( इंजीनियर व कॉंट्रॅक्टर), आर. एन. अभ्यंकर (सेक्रेटरी, पैसाफंड आणि 'कॉमनवेल्थ'चे मॅनेजिंग एजंट ) इत्यादि नांवें सभासदांचे यादींत आहेत.

### निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |
| **सरकारी कर्जरोखे** | |
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११७–१४ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०३—९ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८–१८ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—० |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—३ |
| **निमसरकारी रोखे** | |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११२—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२४—८ |

**मंडळ्यांचे भाग**

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

| | |
|---|---|
| **बँका** | |
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४२—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११६—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३१—० |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५५७—८ |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११५—८ |
| **रेल्वेज** | |
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९६—४ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९५५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७२८–१२ |
| **वीज** | |
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२४—६ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५–१० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १९६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३६१—४ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४३५—० |
| **इतर** | |
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १४५—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४०—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १७—६ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३८–१२ |





अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
**झारापकर टेलरिंग कॉलेज**
आप्पा बळवंत चौक, पुणें १
[ माहितीपत्रक मागवा ]

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण
**संगीत–मार्गदर्शक**
मालेचीं पुस्तकें.

| गायन | हार्मोनियम | दिलरुबा | फिडल् |
|---|---|---|---|
| किं. ६ आ. | किं. २॥ रु. | किं. १ रु. २ आ. | किं. १ रु. ४ आ. |

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.
प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

**स्वल्प व्याजानें कर्ज**

ता. २७ जून १९३८ रोजीं पहिल्या कर्ज वांटणीस कंपनीच्या नियमानुसार श्री. ग. स. मराठे यांच्या सल्याप्रमाणें सुरवात होणार असून पूर्ण पैसे भरून सर्टिफिकेट घेणारांचेच नंबर कर्ज वांटणीच्या यादींत समाविष्ट होतील तरी ज्यांनीं पूर्ण पैसे भरले नसतील त्यांनीं ते ताबडतोब भरावेत व स्वल्प म्हणजे ६॥% व्याजानें रु. १०० ते ५००० (सर्टिफिकेटचें रुपांप्रमाणें ) कर्ज घेऊं इच्छिणारांनीं अवघे रु. २४ भरून, सर्टिफिकेट्स घेण्याची त्वरा करावी. तारखेकडे लक्ष ठेवा. गांवोगांवीं एजन्ट्स पाहिजेत. प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ०= चीं तिकीटें पाठवा. अगर समक्ष भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**
हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

**दि साऊंड बॅंकिंग कॉर्पोरेशन लि.**
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळः—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

अ प–टु–डे ट शि ला ई क र तां

## महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [खादी भांडाराचे माडीवर

अप—टु—डेट पुण्यांत पहिलें उच्च दर्जाचें अप—टु—डेट

## हेअर कटिंग सलून

येथें आधुनिक इलेक्ट्रिक मशीनच्या सहायानें केस कापले जातात. इलेक्ट्रिक हेअर ब्रश व मसाज यांची व्यवस्था. स्वच्छता व टापटीप हें आमचें वैशिष्ट्य. तज्ज्ञ माणसाकडून विजेच्या सहायानें काम सुबक व स्वच्छ होतें.

पत्ता:—प्रो. डी. एम. जाधव, पी. डी. ब्रदर्स बिल्डिंग, टांगा स्टँड शेजारी, डेक्कन जिमखाना.

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

## दि प्रॉव्हिन्शिअल बँक

ऑफ अिण्डिया लिमिटेड

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय: २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन) बंगळूर

शाखा: मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष: खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर: अेस्. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस्:** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस्:** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी:** दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटींवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एस्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट पुणें. — एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें. २

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

## ६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन

त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी

## लिमिटेड, पुणें.

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेची विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए. एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.